बियाणे, खते व कीटकनाशके निविष्ठांच्या गुणवता नियंत्रणाच्या अनुषंगाने तालुकास्तरीय तक्रार निवारण समितीची फेररचना करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

कृषि, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग

शासन परिपत्रक क्रमांक : कृवपदुम-२८०१६/१५६/२०२५-MAG-१७A

(संगणक क्र.- Computer Number ९३५६२२)

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, विस्तार, मुंबई-४०००३२
दिनांक :- १६ जुलै, २०२६.

वाचा:-

१) शासन परिपत्रक क्र. सीपीएस २०२०/प्र.क्र.२६६/१-अे, दि.२४ जून, २०२०.

२) शासन परिपत्रक क्र. कृवपदुम-२८०१६/१५६/२०२५-MAG-१७ अे, दि. २९ जून, २०२५.

३) कृषि आयुक्तालयाचे पत्र क्र. जा.क्र. बियाणे / खरीप २०२६ / सोयाबिन तक्रार /१८४७/२०२६, दि. १० जूलै, २०२६.

शासन परिपत्रक :-

खरीप-२०२६ मध्ये हंगामाच्या सुरवातीस शेतकऱ्यांच्या बियाणे उगवण संदर्भात मोठ्या प्रमाणात तक्रारी प्राप्त होत असलेचे निदर्शनास आले आहे. सध्याच्या तालुकास्तरीय तक्रार निवारण समितीकडून प्रत्येक तक्रारींची शेतकऱ्यांच्या शेतावर जाऊन तपासणी विहित कालमर्यादेत करणे अडचणीचे ठरत आहे. त्यामुळे तपासणी तातडीने करण्याच्या दृष्टिकोनातून संदर्भ क्र.२ नुसार करण्यात आलेल्या तालुकास्तरीय तक्रार निवारण समितीची रचना सुधारीत करण्यात येत आहे.

तालुकास्तरीय तक्रार निवारण समिती

अ.क्र.	समिती सदस्य	पदनाम
१.	तालुका कृषि अधिकारी	अध्यक्ष
२	कृषि विद्यापीठ / कृषि संशोधन केंद्र/कृषि विज्ञान केंद्र यांचे प्रतिनिधी	सदस्य
३	महाबीज प्रतिनिधी (उपलब्धतेनुसार)	सदस्य
४	कृषि अधिकारी (गुनि) ता.कृ.अ. कार्यालय / कृषि अधिकारी (पंचायत समिती) (त्यांना नेमून दिलेल्या कार्यक्षेत्रानुसार)	सदस्य सचिव

२. सदर परिपत्रकाद्वारे संदर्भ क्र.२ अन्वये गठीत तालुकास्तरीय तक्रार निवारण समिती बरखास्त करण्यात येत आहे.

३. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी प्रत्येक तालुक्यासाठी वरीलप्रमाणे समिती गठीत करावी. सदर समितीने निविष्ठा विषयक तक्रारी प्राप्त होताच ७ दिवसांच्या आत क्षेत्रीय भेटी देऊन त्यांची तपासणी करावी व त्याबाबतचा अहवाल अंतिम करावा. तालुक्यातील तक्रारींची संख्या १०० पेक्षा जास्त झाल्यास आयुक्त (कृषि) यांचे मान्यतेने त्या तालुक्यासाठी आवश्यकतेनुसार एका पेक्षा जास्त समित्या गठीत कराव्यात.

३. तक्रार प्राप्त निविष्ठा ज्या कंपनीकडून दिलेली आहे अशा कंपनीच्या प्रतिनिधी व विक्रेते यांना सदर तपासणी दौऱ्याच्या वेळी उपस्थित राहण्याच्या सूचना देण्यात यावेत. तपासणीसाठी संबंधित कंपनीच्या प्रतिनिधींची आणि तक्रारकर्त्या शेतकऱ्यांची साक्ष घेणे बंधनकारक राहील.

४. शेतकऱ्यांकडे निविष्ठा खरेदीच्या पावत्या उपलब्ध आहेत याची खात्री करावी. विहित प्रपत्रातच पंचनामा करण्यात यावा व तात्काळ पंचनामाची प्रत शेतकरी तसेच कंपनी प्रतिनिधी यांना देण्यात यावी. तक्रार असलेल्या बियाण्यांच्या लॉटचा नमुना घेऊन अधिसूचित प्रयोगशाळेकडून त्याची तपासणी करून घ्यावी.

५. संदर्भ क्रमांक २. नुसार कार्यरत असलेली तालुकास्तरीय तक्रार निवारण समिती बरखास्त करण्यात येत असल्याने या समितीकडील निविष्ठा विषयक तक्रारी नव्याने गठीत समितीकडे वर्ग करण्यात याव्यात.

६. उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे तसेच बियाण्याबाबत बियाणे अधिनियम १९६६, बियाणे नियम १९६८ व बियाणे नियंत्रण आदेश १९८३, खतांच्या बाबतीत खत (नियंत्रण) आदेश, १९८५. तसेच किटकनाशके अधिनियम १९६८, किटकनाशके नियम १९७१ व किटकनाशके आदेश १९८६ अन्वये विहित केल्यानुसार सर्व संबंधितांनी कार्यवाही करून शेतकऱ्यांना योग्य गुणवत्तेच्या निविष्ठा उपलब्ध होतील व निविष्ठा विषयक तक्रारींचे निराकरण होईल यासाठी विशेष लक्ष देण्याकरिता आवश्यक त्या विहित प्रपत्रासह अवलंबावयाच्या कार्यपद्धतीबाबत मार्गदर्शक सूचना आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, पुणे यांचेकडून निर्गमित करण्यात याव्यात.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०२६०७१६१४४६४०७६४६ असा आहे. हे शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ATUL NARHARI
KULKARNI

Digitally signed by ATUL NARHARI KULKARNI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=AGRICULTURE AND ADF DEPARTMENT,
2.5.4.20=E7C5A611BC2AADC15956A0762A0B8D94BB26A280EDEEFB41F144168
11A8ACC69, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=F040522B06DFD4ABCDE03A7DBC281E33BB2B3CA0148639F3A4
8CC8D1401646D5, cn=ATUL NARHARI KULKARNI
Date: 2026.07.16 14:47:47 +05'30'

(अ.न.कुलकर्णी)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

२. मा. राज्यमंत्री (वित्त, नियोजन, कृषि, मदत व पुनर्वसन, विधि व न्याय, कामगार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. सचिव (कृषि), यांचे स्वीय सहायक महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
४. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ, अकोला.
६. संचालक, (निविष्ठा व गुणनियंत्रण), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. सर्व कृषि संचालक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
८. सर्व विभागीय कृषि सहसंचालक.
९. सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी.
१०. सर्व उपविभागीय कृषि अधिकारी.
११. सर्व तालुका कृषि अधिकारी.
१२. सर्व कृषि अधिकारी (गुण नियंत्रण), तालुका कृषि अधिकारी.
१३. निवडनस्ती (कार्यासन १७-अे), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.